## नियमित दिवाणी दावा क्रमांक ४४६/२०२४ मधील नि.क्र.२८ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज, वादीतर्फे प्रतिवादी ७ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी ७ सुलोचना शंकर पवार ह्या दावा चालू असताना दिनांक २८.०२.२०२५ रोजी मयत झाल्या आहेत. प्रतिवादी ७ मयत यांचा मृत्युचा दाखला मुदतीमध्ये मिळालेला नसल्यामुळे तसेच सर्व कायदेशीर वारसांची माहिती वादी यांना मुदतीत उपलब्ध न झालेमुळे सदरचा अर्ज दाखल करण्यास विलंब झाला आहे. अर्ज मंजूर होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. वादींना वारस अभिलेखावर घेण्यास १ महिने १० दिवसाचा विलंब झालेला आहे. प्रतिवादी ७ चे वारस अभिलेखावर आले नाही तर वादीचे कशानेही न भरुन येणार असे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी ७ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होवून मिळावा अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जास हरकत घेतली. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार, अर्जातील नमूद कारण योग्य नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. प्रतिपक्षाच्या कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी मागणी केल्यानुसार प्रतिवादी ७ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

### का र ण मि मां सा

४. वादी व प्रतिवादींचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जातील कथनांवरुन वादी यांना प्रतिवादी ७ चे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झाला आहे. वादीने दावा वाटप होऊन कब्जा मिळण्यासाठी, अतिक्रमण काढून मिळणेकरिता व निरंतर ताकीदिसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी ७ चे वारसांना त्याचे पश्चात दावा चालविण्याचा हक्क असल्याने दावा गुणदोषावर चालणेसाठी प्रतिवादी ७ चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी ७ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होणे गरजेचे

आहे. सबब मुद्दा नं.१ होकारार्थी देऊन मुद्दा नं.२ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येते.
२. प्रतिवादी ७ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब रक्कम रुपये ३००/- चे खर्च प्रतिवादीस देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

VAIBHAV BAJRANG GHADAGE

Digitally signed by VAIBHAV BAJRANG GHADAGE
Date: 2025.07.08 17:56:07 +0530

**( व्ही. बी. घाडगे )**

दिनांकः- ०८.०७.२०२५ दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वडूज.